# नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका स्थायी समिती नांदेड.

दिनांक 08.08.2018 सकाळी 11.00 वाजता नांवामनपा स्थायी समितीची सभा मनपाकेच्या मुख्य कार्यालयाचे प्रशाकिय इमारतीतील पहिल्या माळयावरील समिती सभागृहात मध्ये भरविण्यात आली होती. उपस्थिती नोंदणी रजिस्टर मध्ये स्वाक्षरी करुन सदर सभेस खालील म.न.पा. स्थायी समितीचे सदस्य उपस्थित होते.

**श्री अब्दुल शमीम अब्दुल्ला साब, सभापती**

**सर्वश्री**

| | |
|---|---|
| अ. सत्तार अ. गफुर | चव्हाण आनंद शंकरराव |
| पवळे उमेश देवराव | खान म. मसुद अहेमद खान उस्मान खान |
| स. शेर अली अ. महेबुब अली | देशमुख सतिश पुंडलीकराव |
| येवनकर मोहीनी विजय | तिडके प्रशांत विठ्ठल |
| अ. लतीफ अ. मजीद | रावत भानुसिंह गयादिनसिंह |
| मुथा कांताबाई प्रकाशचंद | नवाब गुरमितसिंघ ब-यामसिंघ |
| गोडबोले ज्योत्सना राजु | वैशाली मिलींद देशमुख |

**सभापती** उपस्थित सर्व स्थायी समितीचे स. सदस्य, आयुक्त श्री लहुराज माळी, श्री संतोष कंदेवार मुख्यलेखाधिकारी तथा उपआयुक्त महसुल, कार्यकारी अभियंता श्री गिरीष कदम, कार्यकारी अभियंता श्री सुग्रीव अंधारे, व सर्व विभाग प्रमुख, क्षेत्रिय अधिकारी यांचे स्वागत करुन सभेचे कामकाजास सुरुवात करण्यात येते.

**आनंद चव्हाण** शारदा नगर व शोभा नगर या माझ्या वार्डामध्ये रोड तयार करण्याची फाईल कोठे कोठे जाते, हे आम्हाला माहित आहे. रोड केल्यानंतर ड्रेनेज व पाणी पुरवठा वाल्यानी तीन जोडणी केल्या आहेत. या दोन विभागाचा समन्वय असल्याचे दिसुन येत नाही. हा रस्ता खोदण्यासाठी कोणी परवानगी दिली याची माहिती देण्यात यावी. शारदानगरमधील काम तात्काळ बंद झाले पाहीजे.

**कार्यकारी अभियंता(पापु)** शोभानगरमधील स.सदस्यांनी जो विषय मांडला आहे तो सत्य असून महापालिकेस संबधीत प्लबंरने केवळ 1700 रुपये भरणा करुन जोडणी केली आहे कोणतीही परवानगी त्यांनी घेतली नसल्याने त्याचा परवाना रदद केलेला आहे. इतर दोन ठिकाणी कोणताही चार्ज भरण्यात आलेला नाही त्यांनाही नोटीसा दिलेल्या आहेत. सदरची बाब कोणासही माहिती नव्हती. कनिष्ट अभियंत्यासही नोटीस दिलेली आहे.शारदानगर मधील काम बंद करण्यात आले आहे.

**सतिश देशमुख** तरोडा भागामध्ये एएमआरसीचे एक चुरीची गाडी टाकण्यात येते, आणी दुस-यांदा गाडी येत नाही. नागरीक आम्हाला वारंवार विचारणा करीत आहेत. कंत्राटदार का चुरी टाकत नाही. पंधरा दिवसात चार पाच गाडया पडत आहेत. काय पावसाळा संपल्यानंतर चुरी टाकणार आहात काय याचा खुलासा करावा. त्याच्या दाराजवळ चुरी पडली आमच्या दाराजवळ का पडली नाही याचे उत्तर नागरीकांना आम्ही काय दयावे.

**कार्यकारी अभियंता(सांबावि)** कंत्राटदाराची स्पीड कमी आहे ती स्पीड मध्ये वाढ करण्याची गरज आहे. स्पीड वाढवून चुरी टाकण्यात येईल.

**उप आयुक्त** संबंधीत कंत्राटदारास पत्र देण्यात यावे.

**आनंद चव्हाण** कम्पाउडींगमध्ये आपण फाईल घेतो, आज आम्हाला माहिती कळाली की कोर्टाचा स्टे आहे. जर कोर्टाचा स्टे असेल तर आपण जाहीरात कश्या करीता दिली आहे. आपले उत्पन्न वाढ झाले पाहीजे. कोर्टात स्टे आहे काय याचा खुलासा करावा.

**सहा.संचालक नगररचनाकार** या प्रकरणात प्रथम विधी विभागाचा अहवाल घेण्यात येईल. महानगरपालिका सभेने यापुर्वी कम्पाउडींगच्या संदर्भात ठराव पारीत केलेला आहे त्याच आधारवर प्रस्ताव मागविण्यात येत आहेत.

**स. शेर अली** हायकोर्टाचा निर्णय तो नागपुरच्या न्यायालयाचा असो तो आपणासही बंधनकारक राहणार आहे. तरीही आपल्याकडून जाहीरात देण्यात येते.

**अब्दुल सत्तार** माझ्या प्रभागात नगरोत्थानचा रस्ता करण्यात येत आहे या रस्त्यावर महानगरपालिकेचे शहर अभियंता यांनी व्हीजीट दिलेली नाही. माझ्याकडे सर्व फोटो आहेत. रस्त्याचे काम चालू असल्याने रस्ता किती खोदला पाहीजे हे पाहणी करणे आवश्यक आहे. साईटवर इंजिनियर येत नाहीत, काम कसे दर्जदार होणार ? आम्ही आपणास विनंती करतो की साईट व्हिजीट करावी.

**आयुक्त** सदरील साईटवर उप अभियंता सुनिल देशमुख आहेत ते साईटवर जात असतील.

**आनंद चव्हाण** उप अभियंता सुनिल देशमुख हे ज्या 200 फाईल आहेत ते करतील की नाही यात मला तरी शंका आहे. कम्पांउडींगच्या संचिका त्यांच्याकडून काढून घेण्यात याव्यात. कारण ते काही काम करणार नाहीत. सदरील प्रकरणात सहा. संचालक नगररचनाकार हेच काम करु शकतील.

| | |
|---|---|
| **सभापती** | आपल्याकडे दोन अधिकारी सेवेत रुजू झाले आहेत त्यांचा परिचय देण्यात यावा.<br>(सौ. गिता ठाकरे प्र.उप आयुक्त (प्रशासन),सौ.शोभा मुंडे लेखाधिकारी यांनी आपला परीचय दिला. ) |
| **भानुसिंग रावत** | गणेश टॉकीजच्या रस्त्यावर फार मोठे खडडे झालेले आहे त्याचे टेन्डर निघाले किंवा नाही. जर टेन्डर झाले असेल तर काम का होत नाही, याचा खुलासा करावा.<br>सदरची संचिका सभागृहात मागविण्यात यावी. |
| **स. शेर अली** | गणेश टॉकीजच्या रस्त्याची संचिका मागविण्यात यावी. |
| **कांताबाई मुथा** | प्रभाग क्रमांक 17 मध्ये काबरा यांच्या हॉस्पीटलच्या नळाला घाण पाणी येत आहे. नालीचे व ड्रेनेज मिश्रीत पाणी येत आहे लोक बिमार होत आहे. माझ्याकडे फोटो आहेत. लाईट नाहीत, पोल नाहीत. मी मागील तीन महीण्यापासुन तक्रार करीत आहे. पण त्याची कोणीही दखल घेत नाही. चार मिटींग पासुन एकच विषय घेवून येत आहे तोही सोडविण्यात येत नाही. |
| **सभापती** | ज्या ठिकाणी नळा घाण पाणी येत आहे त्याची तात्काळ पहाणी करावी नळा घाण पाणी येणार नाही याची काळजी कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा यांनी घ्यावी तसेच लाईटची देखील व्यवस्था करण्यात यावी. आजच काम करण्यास आयुक्तांनी संबधीतास सुचना दिलेल्या आहेत. |
| **स. शेर अली** | एका प्रभागात लाईटची देखभाल करण्याकरीता कीती लोक असले पाहीजे. त्यांच्या कडे आता कीती लोक कामाला आहेत याचा तपशिल देण्यात यावा. वार्डात अंधारच अंधार आहे. साईटवर लाईट लावण्यासाठी लोक नाहीत. लाईन निरिक्षकाचे काम आहे की कोणत्या रस्त्यावरील लाईट बंद आहेत हे पाहीले पाहीजे. पण असे होतांना दिसत नाही. |
| **अब्दुल सत्तार** | दोन लोक माझ्या प्रभागात येतात. त्यामुळे लाईटची देखभाल होताना दिसत नाही. |
| **उप अभियंता (विधुत)** | एका प्रभागात एक गँग दिलेली आहे त्यांच्या मार्फत मेन्टन्सचे काम करुन घेण्यात येतात. |
| **स. शेर अली** | विधुत अभियंता हे चुकीची माहीती देत आहेत. एका प्रभागात एक गँग नाही. दोन लोक, दोन दिवसातुन एकदा लाईटच्या कामासाठी येतात. |
| **उप आयुक्त** | उप अभियंता विधुत यांनी कंत्राटदाराचे कार्यरत कर्मचारी कोठे कोण काम करीत आहेत त्यांची नांवे व मोबाईल क्रमांकासहीतची यादी सर्व सदस्यांना देण्यात यावा.एका प्रभागात किती लोक असने आवश्यक आहे. |
| **उप अभियंता (विधुत)** | का प्रभागात एक लाईनमन व दोन हेल्पर असणे आवश्यक आहे. |
| **अब्दुल सत्तार** | प्रभागात 160 लाईट बंद होते, माझ्याकडे यादी आहे. कंत्राटदार काय काम करतो हे सांगावे. चार पाच नळी पाठवून देता या पुढे तो काम करीत नाही. प्रभागातील सर्वच लाईट चालू करुन देण्याची जबाबदारी त्याची आहे. |
| **कांताबाई मुथा** | मुख्य रस्त्यावरील लाईट बंद आहेत. लोकांच्या तक्रारी येत आहेत ती लाईट चालू करुन दयावे. जर काम होत नसतील नगरसेवक पदावर राहुन उपयोग नाही अशा वेळी माझा राजीनामा घ्यावा. |
| **सतिश देशमुख** | वजीराबाद हा वार्ड शहराचा हार्ट ऑफ सिटी आहे. त्यांच्याकडे ही परीस्थिती आहे तर मग आमच्या नविन एरीयाची काय अवस्था असेल हे सांगावे. |
| **सभापती** | नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यीतील विधुत देखभाल दुरुस्तीचे काम करणारे कंत्राटदार हे विधुत खांबा वरील नविन पथदिवे बसविण्याचे व दुरुस्त करण्याच्या कामा बाबतच्या अनेक तक्रारी आलेल्या असुन संबंधीत कंत्राटदाराचे काम समाधानकारक नसल्यामुळे संबंधीताचे पुढील कालावधीचे शिल्लक काम पर्यायी सक्षम व्यवस्था केल्यावर तात्काळ बंद करणे व त्यांना देय असलेल्या देयकाच्या रक्कमेतुन दरवर्षी एक महिण्याचे देयक म्हणजेच त्या एजन्सीच्या नियुक्ती पासुन दर बारा महिण्यामागे एका महिण्याचे देयक दंड म्हणुन कपात करण्यास हि मनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते मान्यते देते. तसेच पुढील वर्षासाठी नव्याने शहरातील विधुत देखभाल दुरुस्तीचे काम करण्यासाठी विधुत विभागाने निविदा प्रक्रिया तात्काळ करुन विहित प्रक्रिया अवलंबुन नियमानुसार कार्यवाही करण्यास ही मनपा स्थायी समितीची सभा सर्वानमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. |

**ठराव क्रं. 42** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यीतील विधुत देखभाल दुरुस्तीचे काम करणारे कंत्राटदार हे विधुत खांबा वरील नविन पथदिवे बसविण्याचे व दुरुस्त करण्याच्या कामा बाबतच्या अनेक तक्रारी आलेल्या असुन संबंधीत कंत्राटदाराचे काम समाधानकारक नसल्यामुळे संबंधीताचे पुढील कालावधीचे शिल्लक काम पर्यायी सक्षम व्यवस्था केल्यावर तात्काळ बंद करणे व त्यांना देय असलेल्या देयकाच्या रक्कमेतुन दरवर्षी एक महिण्याचे देयक म्हणजेच त्या एजन्सीच्या नियुक्ती पासुन दर बारा महिण्यामागे एका महिण्याचे देयक दंड म्हणुन कपात करण्यास हि मनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते मान्यते देते. तसेच

पुढील वर्षासाठी नव्याने शहरातील विधुत देखभाल दुरुस्तीचे काम करण्यासाठी विधुत विभागाने निविदा प्रक्रिया तात्काळ करुन विहित प्रक्रिया अवलंबुन नियमानुसार कार्यवाही करण्यास ही मनपा स्थायी समितीची सभा सर्वानमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**कार्यकारी अभियंता(सांबावि)** लाईटचे मेटन्सचे काम करुन घेण्यासाठी नविन कंत्राटदार नेमणुक करण्याची प्रक्रिया लागलीच चालू करण्यात येईल.

**उप अभियंता (नगरोत्थान)** स.सदस्य यांच्या प्रभागातील नगरोत्थानच्या रस्त्यावर वेळोवेळी साईट व्हिजीट करण्यात येत आहे.

**अब्दुल सत्तार** श्री देशमुख उप अभियंता चुक सांगत आहेत माझ्याकडे फोटो आहेत. त्या फोटामध्ये ते साईटवर आलेले दिसुन येत नाहीत. रस्ता हा मोठा आहे त्याची वेळोवेळी पहाणी झाली पाहीजे हा रस्ता दर्जेदार झाला पाहीजे.

**आयुक्त** सौ. कांताबाई मुथा यांच्या प्रभागातील सर्वच लाईट कार्यकारी अभियंता श्री गिरीष कदम यांनी चालू करुन घ्यावे.

**अब्दुल सत्तार** महानगरपालिकेत आम्ही असतांना लाईटचे मेटन्स मनपा करीत होती आता दहा वर्षातच हे काम बाहेरच्या एजन्सीला दिलेले आहे. त्यावेंळी आम्ही सांगीतलेले काम योग्य पध्दतीने होत होते. रस्त्यावरील खडडे ही मनपाच करीत होती.

**भानुसिंग रावत** रस्त्यावर मोकाट जनावरे बसत आहेत त्याचा त्रास लोकांना होत आहे. अशा मोकाट जनावराचा बंदोबस्त करावा.

**पशु वैद्यकीय अधिकारी** शहरातील आतापर्यत 117 जनावरे पकडली आहेत. अकरा जनावरे हे गोरक्षणला दिलेले आहे. 26 जनावरे मालकांनी सोडून नेले आहेत. आता कोंडवाडयात 21 जनावरे आहेत. जनावरे सोडत असतांना त्याचे आधार कार्ड घेण्यात येते. दाखला घेत नाही. मनपा दाखला देत नाही.

**भानुसिंग रावत** जो पर्यत त्या जनावराचा दाखला मालक दाखल करत नाही तोपर्यत ते जनावर कोंडवाडयातून सोडू नये. महापालिकेकडून दाखला देण्याची व्यवस्था करण्यात यावी. फाईन हा डबल करण्यात यावा. मनपाचा कोंडवाडा एकच आहे यात वाढ करावी.

**पशु वैद्यकि अधिकारी** जनावरे सोडण्यासाठी दबाव तंत्राचा वापर केला जातो. ही बाब वरीष्ठ अधिका-याचे निर्देशनास आणुन दिलेली आहे.

**अब्दुल सत्तार** झोनल अधिकारी यांनी कार्यवाही केली पाहीजे. प्रभागात कोठे खडडे पडले आहेत. नाली, ड्रेनेज, मोकाट जनावरे, साफ सफाई इत्यादी बाबीवर त्यांचे नियंत्रण असले पाहीजे. ते काम करीत नसल्याचे दिसुन येत आहे. त्यांनी सदस्यांच्या बैठकाचे आयोजन करावे. सदस्यांच्या काय समस्या आहेत याची माहिती घेवून कार्यवाही करावी.

**आयुक्त** झोनल अधिकारी यांनी त्यांच्या प्रभागातील लाईट, नाली तुंबली असेल ड्रेनेज, मोकाट जनावरे , साफ सफाई इत्यादी बाबीवर नियंत्रण करावे. त्यांनी सदस्यांच्या बैठकाचे आयोजीत करुन सोडविण्यात याव्यात. सदस्या ज्या तक्रारी आहेत त्याचे इतीवृत तयार करुन सादर करावे.

**सतिश देशमुख** घंटा गाडया कधी फिराव्या याचे काय नियोजन आहे हे सांगावे. घंटा गाडी दररोज येणे अपेक्षीत आहे असे वाटते पण ती येत नाही.

**सहाय्यक आयुक्त (स्वच्छता)** प्रत्येक प्रभागात 4 घंटा गाडी दिलेली आहे व एक 407 दिलेला आहे. यांच्या मार्फत कचरा उचलला जातो. एकुण 90 गाडी दिलेल्या आहेत. बाजाराच्या दिवशीचा कचरा आपण रात्रीच्या रात्रीच उचलत असतो.

**स. शेर अली** जो प्रभाग मोठा आहे त्या प्रभागात जास्तीचे गाडया देण्यात याव्यात त्या एरीयाची सफाई योग्य पध्दतीने होईल.

**अब्दुल सत्तार** रमजान महीण्यात साफसफाई योग्य पध्दतीने केली आहे. त्याबाबत अभिनंदन..

**सभापती** विषय पत्रीका चालू करण्यात यावी.

**विषय क्रं. 01**

**विषय:-** नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीत महात्माफुले व राष्ट्रमाता सावित्रीबाई फुले यांचे पूतळा परिसरात प्रसंगशिल्प पुरवठा करुन बसविणे बाबत

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीत महात्माफुले व राष्ट्रमाता सावित्रीबाई फुले यांचे पूतळा परिसरात प्रसंगशिल्प पुरवठा करुन बसविणेसाठी ई-दरपत्रक सुचना जा.क्रं. नावाशमनपा/साबांवि/4497/2018 दिनांक 26.06.2018 अन्वये दैनिक मराठवाडा नेता / दैनिक नांदेड वार्ता या वृत्तपत्रात दिनांक 07.04.2018 रोजी दरपत्रक मागविले असता एकूण 03 दरपत्रक प्राप्त झाले प्राप्त दरपत्रक त्रिसदस्यीय समिती समोर दिनांक 19.07.2018 रोजी उघडण्यात आले सता त्यांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | दरपत्रक धारकांचे नांव | कामाचे विवरण | दिलेले दर प्रती चौरस मी. |
|---|---|---|---|
| 01 | देवरे अन्ड असोसिएटस औरंगाबाद | महात्माफुले व राष्ट्रमाता सावित्रीबाई फुले यांचे पूतळा परिसरात प्रसंगशिलप पुरवठा करुन बसविणे बाबत | 47,635/- |
| 02 | मे. सुंदर कन्सट्रक्शन नांदेड | महात्माफुले व राष्ट्रमाता सावित्रीबाई फुले यांचे पूतळा परिसरात प्रसंगशिलप पुरवठा करुन बसविणे बाबत | 53,300/- |
| 03 | शेख रियाज इजाज औरंगाबाद | महात्माफुले व राष्ट्रमाता सावित्रीबाई फुले यांचे पूतळा परिसरात प्रसंगशिलप पुरवठा करुन बसविणे बाबत | 53,700/- |

दराच्या तुलनात्मक तक्त्यानुसार सर्वात कमी दर **देवरे अन्ड असोसिएटस औरंगाबाद** यांचे असून जे प्रति चौ. मी. रुपये 47,635/- इतके आहेत सदरचे दर जास्त वाटत असल्याने संबंधीतास दर कमी करण्यासाठी वाघाटी करिता पाचारण केले असता संबंधीतांनी दिनांक 03.08.2018 रोजी लेखी पत्र देवुन सदरचे दर प्रति चौ.मी. रुपये 47,635/- ऐवजी 500/- कमी करुन प्रति चौ.मी. 47,135/- या दराने करण्याचे लेखी समंती दिल्यानुसार सदर कामासाठी **देवरे अन्ड असोसिएटस औरंगाबाद यांचे वाटाघाटी अंती प्रति चौ.मी. 47,135/- दर मंजुरीस्तव तसेच यावर लागणारा खर्च रुपये 14,80,000/- यास प्रशासकिय व आर्थीक मान्यतेस्तव मनपा स्थायी समिती सभे समोर सादर.**

**आनंद चव्हाण** छत्रपती शाहु महाराजा पुतळा आलेला आहे त्याबददल अभिनंदन.. पण हे काम कधी पुर्ण होणार आहे. मला वाटते महात्मा फुले यांच्या पुतळयाचे व छत्रपती शाहू महाराज यांच्या पुतळयाचे काम केंव्हा पुर्ण होवून उदघाटन कधी होईल याचा कालावधी सांगावा.

**आयुक्त** छत्रपती शाहु महाराजा पुतळयाचे उदघाटन शिक्षण दिनी 5 सप्टेंबरला करण्यात येईल व महात्मा फुले पुतळयाचे उदघाटन दस-याला करण्यात येईल.

**स. शेर अली** जे शहरातील अविकसित वार्ड आहेत जसे माझा वार्ड आहे, सांगवी, वसरणी, कौठा, सिडको तरोडा या अविकसीत भागासाठी विशेष पॅकेज देण्यात यावे. नाल्याचे काम करणे आवश्यक आहे पण ते काम आतापर्यत झालेले नाही. आपले नगरसेवक यांनी तो नाला त्यांच्या मालकी जमिनीतून जात असल्याने थांबविलेला आहे. सदरील साईटची व्हिजीट करण्यात यावी त्यानंतर निर्णय घेण्यात यावा.

**सभापती** प्रशासनाने सादर केलेल्या प्रस्तावास मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्रं. 43** **ठराव**

**विषय:-** नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यीत महात्माफुले व राष्ट्रमाता सावित्रीबाई फुले यांचे पूतळा परिसरात प्रसंगशिल्प पुरवठा करुन बसविणे बाबत

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यीत महात्माफुले व राष्ट्रमाता सावित्रीबाई फुले यांचे पूतळा परिसरात प्रसंगशिल्प पुरवठा करुन बसविणेसाठी ई-दरपत्रक सुचना जा.क्रं. नावाशमनपा/साबांवि/4497/2018 दिनांक 26.06.2018 अन्वये दैनिक मराठवाडा नेता / दैनिक नांदेड वार्ता या वृत्तपत्रात दिनांक 07.04.2018 रोजी दरपत्रक मागविले असता एकूण 03 दरपत्रक प्राप्त झाले प्राप्त दरपत्रक त्रिसदस्यीय समिती समोर दिनांक 19.07.2018 रोजी उघडण्यात आले सता त्यांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | दरपत्रक धारकांचे नांव | कामाचे विवरण | दिलेले दर प्रती चौरस मी. |
|---|---|---|---|
| 01 | देवरे अन्ड असोसिएटस औरंगाबाद | महात्माफुले व राष्ट्रमाता सावित्रीबाई फुले यांचे पूतळा परिसरात प्रसंगशिलप पुरवठा करुन बसविणे बाबत | 47,635/- |
| 02 | मे. सुंदर कन्सट्रक्शन नांदेड | महात्माफुले व राष्ट्रमाता सावित्रीबाई फुले यांचे पूतळा परिसरात प्रसंगशिलप पुरवठा करुन बसविणे बाबत | 53,300/- |
| 03 | शेख रियाज इजाज औरंगाबाद | महात्माफुले व राष्ट्रमाता सावित्रीबाई फुले यांचे पूतळा परिसरात प्रसंगशिलप पुरवठा करुन बसविणे बाबत | 53,700/- |

दराच्या तुलनात्मक तक्त्यानुसार सर्वात कमी दर **देवरे अन्ड असोसिएटस औरंगाबाद** यांचे असून जे प्रति चौ. मी. रुपये 47,635/- इतके आहेत सदरचे दर जास्त वाटत असल्याने संबंधीतास दर कमी करण्यासाठी वाघाटी करिता पाचारण केले असता संबंधीतांनी दिनांक 03.08.2018 रोजी लेखी पत्र देवुन सदरचे दर प्रति चौ.मी. रुपये 47,635/- ऐवजी 500/- कमी करुन प्रति चौ.मी. 47,135/- या दराने करण्याचे लेखी समंती दिल्यानुसार सदर कामासाठी **देवरे अन्ड असोसिएटस औरंगाबाद यांचे वाटाघाटी अंती प्रति चौ.मी. 47,135/- दर करते तसेच यावर लागणारा खर्च रुपये 14,80,000/- ला प्रशासकिय व आर्थीक मान्यता हि मनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.**

**विषय क्रं. 02**

**विषय :-** <u>छत्रपती शाहु महाराज यांच्या 12 फुटी पुतळयाची वाढीव रक्कम शिल्पकारास देण्यास मान्यता देणे बाबत</u>

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यीत शासकीय कृषी विद्यालय नांदेड येथील मोकळया जागेवर छत्रपती राजर्षी शाहु महाराज यांचा पुतळा उभारणे बाबतचे काम **मे. सावंत आर्ट स्टूडीओ, मुंबई** यांना देण्यात आलेला आहे. संबंधीतास दिलेले आदेश व करारनामा अटी शर्ती प्रमाणे एकूण 31 लख रुपया पैकी 40% अंग्रिम व पुतळयास कला संचनालयाची मान्यता मिळाल्यानंतर 30% + 20% (स्थायी समिती, नावाशमनपा ठराव क्रं. 45 दिनांक 29.05.2017 अन्वये अदा) अशी एकूण 90% रक्क्म संबंधीतांना अदा करण्यात आलेली आहे.

संबंधीत शिल्पकार हे पुतळा ठेवण्याचा किराया (14,40,000/-) दोन वॉचमन (7,020,000/-) वाढलेले मटेरीयल व मजलुरी (6020,000/-) इत्यादी बाबींवर होणारा वाढीव 27,80,000/- रुपयांची मागणी करत आहेत यामुळे वाढीव रक्कम अदा करण्यासाठी केलेल्या पाठपुराव्यानुसार योग्यतो निर्णय घेणे आवशयक होते.

उपरोक्त मागणीच्या आधारे संबंधीतांच्या कामाचा कालावधी दिनांक 06.11.2012 ते 06.11.2013 असा एका वर्षाचा धरल्यास एकूण 04 वर्षाचा कालावधी उशीर झालेला आहे. एकूण चार वर्षाचा कालावधीतील फक्त पुतळा ठेवण्याचा किराया (14,40,000/-) व दोन वॉचमेन (7,20,000/-) करीता एकूण रुपये 21,60,000/- इतक्या रक्कमे ऐवजी रुपये 5,00,000/- ऐवढीव वाढीव रक्कम अदा करणे योग्य वाटते.

तरी उक्त 5,00,000/- रुपयांच्या वाढीव रक्कमेस मान्यता घेण्यासाठी सदरचा प्रस्ताव मनपा स्थायी समिती सभेसमोर सादर.

**सभापती** प्रशासनाने सादर केलेल्या प्रस्तावास मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्रं. 44** **ठराव**

**विषय :-** <u>छत्रपती शाहु महाराज यांच्या 12 फुटी पुतळयाची वाढीव रक्कम शिल्पकारास देण्यास मान्यता देणे बाबत</u>

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यीत शासकीय कृषी विद्यालय नांदेड येथील मोकळया जागेवर छत्रपती राजर्षी शाहु महाराज यांचा पुतळा उभारणे बाबतचे काम **मे. सावंत आर्ट स्टूडीओ, मुंबई** यांना देण्यात आलेला आहे. संबंधीतास दिलेले आदेश व करारनामा अटी शर्ती प्रमाणे एकूण 31 लख रुपया पैकी 40% अंग्रिम व पुतळयास कला संचनालयाची मान्यता मिळाल्यानंतर 30% + 20% (स्थायी समिती, नावाशमनपा ठराव क्रं. 45 दिनांक 29.05.2017 अन्वये अदा) अशी एकूण 90% रक्क्म संबंधीतांना अदा करण्यात आलेली आहे.

संबंधीत शिल्पकार हे पुतळा ठेवण्याचा किराया (14,40,000/-) दोन वॉचमन (7,020,000/-) वाढलेले मटेरीयल व मजलुरी (6020,000/-) इत्यादी बाबींवर होणारा वाढीव 27,80,000/- रुपयांची मागणी करत आहेत यामुळे वाढीव रक्कम अदा करण्यासाठी केलेल्या पाठपुराव्यानुसार योग्यतो निर्णय घेणे आवशयक होते.

उपरोक्त मागणीच्या आधारे संबंधीतांच्या कामाचा कालावधी दिनांक 06.11.2012 ते 06.11.2013 असा एका वर्षाचा धरल्यास एकूण 04 वर्षाचा कालावधी उशीर झालेला आहे. एकूण चार वर्षाचा कालावधीतील फक्त पुतळा ठेवण्याचा किराया (14,40,000/-) व दोन वॉचमेन (7,20,000/-) करीता एकूण रुपये 21,60,000/- इतक्या रक्कमे ऐवजी रुपये 5,00,000/- ऐवढीव वाढीव रक्कम अदा करण्यास मनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते मान्यता देण्यात येते.

तरी उक्त 5,00,000/- रुपयांच्या वाढीव रक्कमेस हि मनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्रं. 03** **प्रस्ताव**

नांदेड शहरा मध्ये रिलायन्स कंपनीचे OFC केबल टाकण्याकरिता सर्वप्रथम 50 कि.मी. लांबीची परवानगी देण्यात आली होती त्यानंतर 10 कि.मी. लांबीची केबल टाकण्याकरिता परवानगी दिली असता पावसाळयाच्या दिवसात सदरची लाईन टाकू नये अशी मागणी शहरातील नागरीकांकडून करण्यात आल्यामुळे 10 कि.मी. लांबीचे काम थांबविण्यास सांगण्यात आले होते. तदनंतर 13 कि.मी. लांबीची लाईन टाकण्याकरिता परवानगीसाठी रिलायन्स कंपनी मार्फत महापालिकेस विनंती करण्यात आली आहे तसेच शहरामध्ये टी.व्ही. केबल जोडणी सुरु करण्यासाठी शहरातील पथदिव्यांच्या पोलवरुन केबल टाकण्यासाठी रिलायन्स कंपनीने मनपाकडे परवानगी मागितलेली आहे अशी माहिती आहे.

तरी 50 कि.मी. लांबीची नंतर 10 कि.मी. लांबीची व त्यानंतर 13 कि.मी. लांबीची OFC केबल टाकण्याकरिता कोणते दर आकारण्यात आले या करिता महासभा किंवा स्थायी समितीची मान्यता घेतलेली आहे किंवा कसे तसेच उक्त नमुद कंपनी समवेत जो कांही करारनामा झाला त्यातील नियम व अटींची अमलबजावणी झाली किंवा होते आहे का, हे पाहण्याची जबाबदारी कोणत्या विभागाची अथवा अधिका-यांची आहे तसेच शहरामध्ये या कंपनीचे जे टॉवर उभे आहेत त्याकरिता त्यांनी मनपाकडे परवानगी मागितलेली होती किंवा कसे याची सविस्तर माहिती सभागृहास देणे करिताचा प्रस्ताव मनपा स्थायी समितीच्या सभागृहासमोर सादर.

**सुचक** :- सय्यद शेर अली. **अनुमोदक** :- मसुद अहेमद खान, अ. लतीफ मजीद

| | |
|---|---|
| **माहिनी येवनकर** | मा. अशोकरावजी चव्हाण साहेब यांनी मिटींग मध्ये पावसाळा बंद झाल्यानंतर केबलचे काम करावे असे सांगीतले होते परंतू आता पावसाळा सुरु आहे. तरीही केबल टाकण्याचे काम चालू आहे. ते काम बंद करावे. रिलांयन्स कंपनीने टॉवर उभारणीचे काम चालू केले आहे. त्या इमारतीला परवानगील आहे किंवा नाही याची चौकशी करण्यात यावी. परवानगी घेतली नसेल तर ते काम तात्काळ स्थगीत करावे.रिलायन्स कंपनीने जे केबल टाकण्याचे काम करीत आहे त्यास मनपाची परवानगी आहे की नाही. |
| **स. शेर अली** | केबल टाकण्यासाठी सर्वात प्रथम 50 किलोमिटरची परवानगी देण्यात आली होती.त्यानंतर 10 किलोमिटर केबल टाकण्याची परवानगी देण्यात आली. पुन्हा 13 किमी ची परवानगी देण्यात आली. या पध्दतीने आपण परवानगी दिलेली आहे काय याचा खुलासा विभाग प्रमुखांने दयावा. केबल टाकण्यासाठी परवानगी महा सभेची अथवा स्थायी समितीची घेतली किंवा नाही हे सांगावे. आपण कोणता शासन निर्णय वापर करता. टॉवरला रिनीव्हल करण्यासाठी कोणत्या जीआरचा वापर करता हे सांगावे. |
| **कार्यकारी अभियंता (सांबावि)** | आपण परवानगीच्या वेळी दि. 1 एप्रील 2006 हा शासन निर्णय रदद करुन दि. 17 फेब्रुवारी 2018 चा शासन निर्णय नुसार कार्यवाही करण्यात येते. |
| **स. शेर अली** | 4 मार्च 2014 च्या शासन निर्णयाची आवश्यकता नाही काय ? या शासन निर्णयाचे शेडयूल आहे त्याचे वाचन केले. रोड व्हिडथ फालो करतो काय, इमारतीलची हाईट फालो करतो काय. रिनीव्हल कधी करतो. पुर्ण टावरची परवानगी घेतो काय ? यावर थर्ड पार्टी ऑडीट झाले पाहीजे. सिनीयर सदस्याची एक समिती गठीत करण्यात यावी. एक तांत्रीक कमीटी तयार करण्यात यावी. |
| **सहा.संचालक नगररचना** | जे नियमानुसार चार्जेस आहे ते आपण वसुल करुन घेतो. |
| **सभापती** | सर्वात प्रथम आपण 50 किमीची लाईनला परवानगी देण्यात आली. यांनी ज्या ठिकाणी परवानगी दिली आहे त्या ठिकाणची मनपाची पाण्याची व ड्रेनेजची लाईनच तुटलेली आहे. तुटलेली आहेत त्याची वसुली करण्यात यावी. पावसाळा चालू असल्याने हे बंद करण्यात यावे असे आश्वासन मा. आयुक्त महोदयांनी दिलेले होते. पावसाळयातही केबल टाकण्याचे काम चालू आहे. सभागृहाची मान्यतेची आवश्यकता आहे. |
| **अब्दुल सत्तार** | केबल टाकण्याच्या कामाची चौकशी करण्यात यावी. ते काम रदद करण्यात यावे. सर्व साधारण सभेची मान्यतेची आवश्यकता आहे. फेरबदल करण्याचे अधिकार सभेस आहेत. |
| **आनंद चव्हाण** | ओएफसी केबल व एचडीडी केबल टाकण्याचे काम किती झाले याची माहिती देण्यात यावी. आपण परवानगी देत असतांना दोन एमबीपीएस ब्रॉंड बँडची सुविधा सर्व झोन कार्यालयास देण्यात यावी असा करार झाला होता. ती सेवा त्यांनी दिली काय हे सांगावे. ती सुविधा न देता दुस-या 10 किलो मिटरची परवानगी कशाचे आधारे दिली आहे. तो कराराप्रमाणे काय झाले ते सांगावे. |
| **सभापती** | माझ्या प्रभागात टॉवर बसविण्यात येत होते त्या इमारतीला परवानगी नसतानांही टॉवर उभारण्यात येत होते. मी यादीसहीत माहीती दिलेली आहे त्याप्रमाणे झोनल अधिकारी यांनी काय कार्यवाही केली हे सांगावे. |
| **क्षेत्रिय अधिकारी क्रमांक 1** | चार ठिकाणी टॉवर उभारण्याची प्रक्रिया चालू होती ती थांबविण्यात आली आहे. |
| **क्षेत्रिय अधिकारी क्रमांक 5** | तीन सिडको मध्ये दोन मोबाईल टॉवर बंद आहेत. |
| **क्षेत्रिय कार्यालय क्रमांक 3** | माझ्या कडे दोन चालू होते ते बंद केले. |
| **आनंद चव्हाण** | 50 किमी लाईन टाकण्यापुर्वी जो कंपनीशी जो करार झाला होता त्याप्रमाणे कार्यवाही झाली काय हे सांगावे मागे यावर एक सर्वसाधारण सभा चालली होती. कंपनी लाखो रुपयाचे उत्पन कमविते आहे. आपलीही आर्थिक परीस्थिती सुधारली पाहीजे. |
| **स. शेर अली** | ज्या इमारतीवर टॉवर बसविण्यात येत आहे त्यास इमारतीची बांधकाम परवानगी आहे काय, इमारतीचे स्टॅबीलीटीचे प्रमाणपत्र घेतले काय हे सांगावे. काही अपघात झाला तर त्याची जीमेदारी कोणाची असेल. किती टॉवर उभारले, किती पैसे वसुल झाले, तसेच केबल टाकण्याची परवानगी दिली होती काय. संबंधीत एजन्सीने किती कि.मी. लाईन टाकण्यात आली. |
| | नांदेड शहरा मध्ये रिलायन्स कंपनीचे OFC केबल टाकण्याकरिता सर्वप्रथम 50 कि.मी. लांबीची परवानगी देण्यात आली होती त्यानंतर 10 कि.मी. लांबीची केबल टाकण्याकरिता परवानगी दिली असता पावसाळयाच्या दिवसात सदरची लाईन टाकू नये अशी मागणी शहरातील नागरीकांकडून करण्यात आल्यामुळे 10 कि.मी. लांबीचे काम थांबविण्यास सांगण्यात आले होते. तदनंतर 13 कि.मी. लांबीची लाईन टाकण्याकरिता परवानगीसाठी रिलायन्स कंपनी मार्फत |

महापालिकेस विनंती करण्यात आली आहे तसेच शहरामध्ये टी.व्ही. केबल जोडणी सुरु करण्यासाठी शहरातील पथदिव्यांच्या पोलवरुन केबल टाकण्यासाठी रिलायन्स कंपनीने मनपाकडे परवानगी मागितलेली आहे अशी माहिती आहे.

त्यानुसार शहरातील रिलायन्स कंपनीचे OFC केबल टाकण्याचे काम सध्या चालु असुन संबंधीतास परवानगी देणे हे धोरणात्मक निर्णय असुन महसभेची मान्यता घेण्यात आलेली नाही तसेच त्यांचे दर ठरविण्याचे अधिकार स्थायी समितीस असुन ते ही मान्यता घेण्यात आलेली नाही तसेच संबंधीत कंपनी हे केबल टाकतांना रस्ते खोदण्याचे काम केल्यामुळे मनपाकेची ड्रेनेज लाईन व पाण्याची पाईप लाईन अनेक ठिकाणी फुटलेली असल्याचे निदर्शनास आलेले आहे त्यामुळे सदरची नुकसान भरपाई संबंधीत कंपनी मार्फत वसुल करण्यास मान्यता देण्यात येते.

तसेच सदर कामाची वरील प्रमाणे चौकशी करण्यासाठी सभापती स्थायी समिती यांच्या अध्यक्षते खाली श्री स. शेर अली, श्री भानुसिंह रावत, सौ. मोहिणी येवनकर तसेच श्री संतोष कंदेवार मुख्यलेखाधिकारी, श्री आनंद शंकरराव चव्हाण, श्री स. अजीतपालसिंघ संधु विधी अधिकारी यांची उपसमिती गठीत करण्यता येत असुन सदरील उपसमितीने उक्त प्रकरणाची सविस्तर चौकशी करुन आपला चौकशी अहवाल स्थायी समिती समोर सादर करुन त्यावर स्थायी समितीने निर्णय घेण्यात यावा असा मी दुरुस्ती प्रस्ताव मांडत आहे त्यास मान्यता देण्यात यावी.

**आनंद चव्हाण** श्री स. शेर अली यांनी जो दुरुस्ती प्रस्ताव मांडला त्यास माझे अनुमोदन आहे.

**सभापती** श्री स. शेर अली यांनी पुढील प्रमाणे प्रस्ताव मांडला :- नांदेड शहरा मध्ये रिलायन्स कंपनीचे OFC केबल टाकण्याकरिता सर्वप्रथम 50 कि.मी. लांबीची परवानगी देण्यात आली होती त्यानंतर 10 कि.मी. लांबीची केबल टाकण्याकरिता परवानगी दिली असता पावसाळयाच्या दिवसात सदरची लाईन टाकू नये अशी मागणी शहरातील नागरीकांकडून करण्यात आल्यामुळे 10 कि.मी. लांबीचे काम थांबविण्यास सांगण्यात आले होते. तदनंतर 13 कि.मी. लांबीची लाईन टाकण्याकरिता परवानगीसाठी रिलायन्स कंपनी मार्फत महापालिकेस विनंती करण्यात आली आहे तसेच शहरामध्ये टी.व्ही. केबल जोडणी सुरु करण्यासाठी शहरातील पथदिव्यांच्या पोलवरुन केबल टाकण्यासाठी रिलायन्स कंपनीने मनपाकडे परवानगी मागितलेली आहे अशी माहिती आहे.

त्यानुसार शहरातील रिलायन्स कंपनीचे OFC केबल टाकण्याचे काम सध्या चालु असुन संबंधीतास परवानगी देणे हे धोरणात्मक निर्णय असुन महसभेची मान्यता घेण्यात आलेली नाही तसेच त्यांचे दर ठरविण्याचे अधिकार स्थायी समितीस असुन ते ही मान्यता घेण्यात आलेली नाही तसेच संबंधीत कंपनी हे केबल टाकतांना रस्ते खोदण्याचे काम केल्यामुळे मनपाकेची ड्रेनेज लाईन व पाण्याची पाईप लाईन अनेक ठिकाणी फुटलेली असल्याचे निदर्शनास आलेले आहे त्यामुळे सदरची नुकसान भरपाई संबंधीत कंपनी मार्फत वसुल करण्यास मान्यता देण्यात येते.

तसेच सदर कामाची वरील प्रमाणे चौकशी करण्यासाठी सभापती स्थायी समिती यांच्या अध्यक्षते खाली श्री स. शेर अली, श्री भानुसिंह रावत, सौ. मोहिणी येवनकर तसेच श्री संतोष कंदेवार मुख्यलेखाधिकारी, श्री आनंद शंकरराव चव्हाण, श्री स. अजीतपालसिंघ संधु विधी अधिकारी यांची उपसमिती गठीत करण्यता येत असुन सदरील उपसमितीने उक्त प्रकरणाची सविस्तर चौकशी करुन आपला चौकशी अहवाल स्थायी समिती समोर सादर करुन त्यावर स्थायी समितीने निर्णय घेण्यासाठीचा जो प्रस्ताव मांडला त्यास मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**ठराव क्रं. 45** **ठराव**

नांदेड शहरा मध्ये रिलायन्स कंपनीचे OFC केबल टाकण्याकरिता सर्वप्रथम 50 कि.मी. लांबीची परवानगी देण्यात आली होती त्यानंतर 10 कि.मी. लांबीची केबल टाकण्याकरिता परवानगी दिली असता पावसाळयाच्या दिवसात सदरची लाईन टाकू नये अशी मागणी शहरातील नागरीकांकडून करण्यात आल्यामुळे 10 कि.मी. लांबीचे काम थांबविण्यास सांगण्यात आले होते. तदनंतर 13 कि.मी. लांबीची लाईन टाकण्याकरिता परवानगीसाठी रिलायन्स कंपनी मार्फत महापालिकेस विनंती करण्यात आली आहे तसेच शहरामध्ये टी.व्ही. केबल जोडणी सुरु करण्यासाठी शहरातील पथदिव्यांच्या पोलवरुन केबल टाकण्यासाठी रिलायन्स कंपनीने मनपाकडे परवानगी मागितलेली आहे अशी माहिती आहे.

त्यानुसार शहरातील रिलायन्स कंपनीचे OFC केबल टाकण्याचे काम सध्या चालु असुन संबंधीतास परवानगी देणे हे धोरणात्मक निर्णय असुन महसभेची मान्यता घेण्यात आलेली नाही तसेच त्यांचे दर ठरविण्याचे अधिकार स्थायी समितीस असुन ते ही मान्यता घेण्यात आलेली नाही तसेच संबंधीत कंपनी हे केबल टाकतांना रस्ते खोदण्याचे काम केल्यामुळे मनपाकेची ड्रेनेज

लाईन व पाण्याची पाईप लाईन अनेक ठिकाणी फुटलेली असल्याचे निदर्शनास आलेले आहे त्यामुळे सदरची नुकसान भरपाई संबंधीत कंपनी मार्फत वसुल करण्यास मान्यता देण्यात येते.

तसेच सदर कामाची वरील प्रमाणे चौकशी करण्यासाठी सभापती स्थायी समिती यांच्या अध्यक्षते खाली श्री स. शेर अली, श्री भानुसिंह रावत, सौ. मोहिणी येवनकर तसेच श्री संतोष कंदेवार मुख्यलेखाधिकारी, श्री आनंद शंकरराव चव्हाण, श्री स. अजीतपालसिंघ संधु विधी अधिकारी यांची उपसमिती गठीत करण्यता येत असुन सदरील उपसमितीने उक्त प्रकरणाची सविस्तर चौकशी करुन आपला चौकशी अहवाल स्थायी समिती समोर सादर करुन त्यावर स्थायी समितीने निर्णय घेण्यास हि मनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्रं. 04** **प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभागामध्ये एकत्रीत वेतनावर 12 पंप ऑपरेटर हे दिनांक 18.08.07 पासुन कार्यरत आहेत त्यांना नगरविकास विभाग शासन परिपत्रक क्रं. संकीर्ण-2016/प्र.क्र.24/नवि-20 मंत्रालय मुंबई-32 दिनांक 22.01.16 व सहाय्यक कामगार आयुक्त नांदेड यांचे पत्र जा.क्रं. सकाअ/नांदेड/आस्था/2016/1657 दिनांक 17.11.16 रोजी मनपाकेस पाठविण्यात आलेल्या पत्राच्या अनुषंगाने उद्योग उर्जा व कामगार विभाग यांच्या अधिसुचना क्रं. कीवेअ 2014/ 510/प्रक्र.150/कामगार-7 दिनांक 14.02.15 च्या अधिसुचनेतीलनमुद केलेल्या कामगाराच्या वर्गवारी प्रमाणे अनुज्ञेय असलेले किमान वेतन व त्यावर दर सहा महिण्यासाठी अनुज्ञेय असलेला विशेष भत्ता देणे बंधनकारक आहे सदरील 12 पंप ऑपरेटर हे जवळपास 10 वर्षापासुन पंप ऑपरेटर या पदावर काम करीत असल्याने त्यांना किमान वेतन आयोगाप्रमाणे वेतन वाढ देवुन त्यावर दर सहा महिण्यासाठी अनुज्ञेय असलेला विशेष भत्ता अधिसुचनेच्या तारखेपासुन देण्यास ही स्थायी समितीची सभा मान्यता प्रदान करते व हा ठराव याच सभेत कायम करते.

**सुचक** :- प्रशात विठ्ठलराव तिडके **अनुमोदक** :- देशमुख सतीश पुंडलीकराव

**सभापती** स. सदस्यांचा प्रस्ताव मंजुर करण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. नियमानुसार आयुक्तांनी तांत्रीक बाब तपासुन पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**ठराव क्रं. 46** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभागामध्ये एकत्रीत वेतनावर 12 पंप ऑपरेटर हे दिनांक 18.08.07 पासुन कार्यरत आहेत त्यांना नगरविकास विभाग शासन परिपत्रक क्रं. संकीर्ण-2016/प्र.क्र.24/नवि-20 मंत्रालय मुंबई-32 दिनांक 22.01.16 व सहाय्यक कामगार आयुक्त नांदेड यांचे पत्र जा.क्रं. सकाअ/नांदेड/आस्था/2016/1657 दिनांक 17.11.16 रोजी मनपाकेस पाठविण्यात आलेल्या पत्राच्या अनुषंगाने उद्योग उर्जा व कामगार विभाग यांच्या अधिसुचना क्रं. कीवेअ 2014/ 510/प्रक्र.150/कामगार-7 दिनांक 14.02.15 च्या अधिसुचनेतील नमुद केलेल्या कामगाराच्या वर्गवारी प्रमाणे अनुज्ञेय असलेले किमान वेतन व त्यावर दर सहा महिण्यासाठी अनुज्ञेय असलेला विशेष भत्ता देणे बंधनकारक आहे सदरील 12 पंप ऑपरेटर हे जवळपास 10 वर्षापासुन पंप ऑपरेटर या पदावर काम करीत असल्याने त्यांना किमान वेतन आयोगाप्रमाणे वेतन वाढ देवुन त्यावर दर सहा महिण्यासाठी अनुज्ञेय असलेला विशेष भत्ता अधिसुचनेच्या तारखेपासुन देण्यास ही स्थायी समितीची सभा मान्यता प्रदान करते व हा ठराव याच सभेत कायम करते. आयुक्तांनी तांत्रीक बाब तपासुन नियमानुसार पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**सभापती** आजच्या सभेचे कामकाज संपल्यामुळे लगेचच दिनांक 04.08.2018 रोजीची पुढे ढकलण्यात आलेली मनपा स्थायी समितीची सभेचे कामकाजास सुरुवात करण्यात येते

**स्वाक्षरीत/-**
**नगरसचिव,**
नांवाशमनपा, नांदेड.

**स्वाक्षरीत/-**
**सभापती,**
**स्थायी समिती, नांवाशमनपा, नांदेड.**